**नमुना क्रमांक**
**भाग 'अ'**
**न्यायनिर्णय**

| | | |
|---|---|---|
| | | **विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग देवगड तालुका देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग. (पिठासीन अधिकारी श्रीकांत एस. पचंडी) (दिनांक ०९/०६/२०२६) संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११०/२०२५ सी.एन.आर.क्र.एमएचएसआय ०९०००२७२२०२५ निशाणी क्र. ६ लगत** |
| | | (गुन्हा क्रमांक ८२/२०२५, देवगड पोलीस ठाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग ) |
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे देवगड पोलीस ठाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |
| सरकारतर्फे | | श्री. एम.जी.काळदाते, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | | अनिस महम्मद होलसेकर<br>वय– ४५ वर्षे, धंदा – मोलमजुरी,<br>रा. देवगड किल्ला, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |
| आरोपीतर्फे | | विद्वान वकील श्रीमती ए.ए.गोरे |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेल्याची तारीख | १५/०६/२०२५ |
| प्रथम छापील खबर दिनांक | १५/०६/२०२५ |
| अंतिम अहवाल दाखल झाल्याचा दिनांक | ०४/०७/२०२५ |
| गुन्ह्याचा संक्षेप नोंदवल्याची तारीख | ०५/०८/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २८/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०९/०६/२०२६ |
| शिक्षा सुनावणीची तारीख, असल्यास | –– |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटणेची तारीख | गुन्हयाचे आरोपसह | निर्दोष असो वा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनिस महम्मद होलसेकर | -- | ०५/०८/२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) | निर्दोष मुक्तता | -- | -- |

**भाग 'क'**

**अ. अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| सा.क्र.१ | प्रशांत परशुराम आचरेकर | पंच |
| सा.क्र.२ | मुख्तार अब्दुल गणी शेख | पंच |
| सा.क्र.३ | उदय मोतिराम शिरगावकर | फिर्याद |
| सा.क्र.४ | सानवी नितीन चोपडेकर | तपासी अंमलदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असतील तर :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | - | - |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असतील तर :–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | – | – |

**ड. फिर्यादी/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांची यादी :–**

**अ. अभियोग पक्ष :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी१/पी.डब्ल्यू १ | पंचनाम्यावरील सही |
| २. | पी२/पी.डब्ल्यू २ | पंचनाम्यावरील सही |
| ३. | पी३/पी.डब्ल्यू ३ | फिर्याद |

**ब. बचाव पक्ष :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | – |

**क. न्यायालयीन निशाणी :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | सी–१ | रासायनिक तपासणी अहवाल |

**ड. भौतिक वस्तु :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | – |

सदर प्रकरणामध्ये आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याचे विरुध्द खोटी केस असल्याचा बचाव घेतला आहे.

०२. अभिलेखाचे अवलोकन केले. अभियोग पक्षातर्फे सदर प्रकरणात चार साक्षीदार तपासण्यात आले आहेत. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावर आलेला साक्षी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता, तसेच आरोपी तर्फे वकील यांचा युक्तीवाद यातून याकामी उपस्थित होणारे प्रश्न व त्यावरील उत्तरे कारणांसहित खालील प्रमाणे नोंदविलेली आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | दि.१५/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०७.१५ वा. च्या सुमारास मौजे देवगड बाजारपेठ, जगतापवाडी, ता.देवगड येथे आरोपी गोवा बनावटीच्या १८० मिली मापाच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या ४८ बाटल्या, हेवार्डस फाईन व्हीस्कीच्या १२ बाटल्या आणि हनी ब्लेन्ड प्युअर ब्रॅण्डीच्या २९ बाटल्या विना परवाना चोरटा विक्री व्यवसाय करण्यासाठी बाळगून होता, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | .... नाही. |
| २. | अंतिम आदेश ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### प्रश्न क्र. १ करीताः–

०३. अभियोग पक्षाचे सा.क्र.१ प्रशांत आचरेकर यांच्या सरतपासात असे आले आहे की, दि.१५/०६/२०२५ रोजी ते रस्त्यावरुन कामावर जात होते. त्यावेळेस पोलिसांनी बोलावून त्यांची सही घेतली. पोलिसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही लिखापढी केली नाही. पोलिसांच्या सांगण्यावरुन त्यांनी सही केली. अभियोग पक्षाचे सा.क्र.२ मुख्तार शेख यांच्या सरतपासात असे आले आहे की, त्यांना पोलिसांनी पंचनामा करण्या करिता कोठेही बोलवले नव्हते. त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नव्हता. ते घरी जात असताना पोलिसांनी थांबवून त्यांची सही घेतली. पोलिसांच्या सांगण्यावरुन त्यांनी सही केली. सा.क्र.१ प्रशांत आचरेकर व सा.क्र.२ मुख्तार शेख यांनी पंचनाम्यावरील अनुक्रमे नि.क्र.पी१/पी.डब्ल्यू १ आणि नि.क्र.पी२/पी.डब्ल्यू २ ची सही मान्य करुन त्यातील मजकुराबाबत सांगता येणार नसल्याचे सांगितले आहे. सा.क्र. १ प्रशांत आचरेकर व सा.क्र.२ मुख्तार शेख हे त्यांच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ताच्या वतीने त्यांना सुचक प्रश्न विचारले असताही सा.क्र.१ प्रशांत आचरेकर व सा.क्र.२ मुख्तार शेख यांच्या पुराव्यात अभियोग पक्षास मदत करणारा कुठलाही पुरावा उपलब्ध झाला नाही.

०४. अभियोग पक्षाचे सा.क्र.३ उदय शिरगावकर यांच्या सरतपासात असे आले आहे की, दि.१५/०६/२०२५ रोजी पो.स्टे देवगड येथे हजर असताना अशी विश्वसनीय माहिती मिळाली की, एक इसम अवैधरित्या दारु व्यवसाय करतो. सदरची माहिती ठाणे प्रभारी यांना दिली. त्यानंतर ते स्वत:, सहाय्यक पोलीस निरीक्षक बंगडे, पोलीस कॉन्स्टेबल देसाई, पो.हे.कॉ. सावंत व लगड असे प्रोव्ही वॉच कामी देवगड बाजारपेठ येथे खाजगी वाहनाने गेले. सदर ठिकाणी सहाय्यक पोलीस निरीक्षक बंगडे यांनी दोन पंचांना बोलावून अवैध धंद्या विषयी छापा टाकावायचा आहे असे सांगून पंच म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली.

पंचांनी संमती दर्शविल्यावर आम्ही जगतापवाडी, देवगड येथे पायी जात असताना टपरीच्या जवळ आंब्याच्या झाडाखाली एक इसम संशयास्पदरित्या हालचाल करीत असलेला दिसून आला. त्यांनी पुढे जाऊन सदर इसमास थांबवले. त्याच्या जवळ असणाऱ्या किलतानाच्या पिशवीची खात्री केली. त्यामध्ये गोवा बनावटीच्या दारुने भरलेल्या सिलबंद बॉटल मिळून आल्या. त्याने त्याचे नाव अनिस महम्मद होलसेकर असे सांगितले. आरोपी कडून बॉब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या ४८ बॉटल, हायवर्डसच्या १२ बॉटल, हनी ब्लेन्ड प्युअर ब्रॅण्डीच्या २९ बॉटल, दारु मिळून आली. सदर मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करुन त्यामधील प्रत्येकी एक बॉटल प्रत्यंतरा करिता वेगळी काढली. घटनास्थळी पंचनामा केला. आरोपी यास अटके संबंधी नोटीस दिली. त्यानंतर त्यांनी नि.क्र.पी३/पी.डब्ल्यू३ प्रमाणे फिर्याद दाखल केली असे सांगितले. सदर साक्षीदाराने उलटतपासात आरोपीतर्फे देण्यात आलेल्या इतर सुचक प्रश्नांना स्पष्ट नकार दिला आहे.

०५. अभियोग पक्षाचे सा.क्र.४ सानवी चोपडेकर यांच्या सरतपासात असे आले आहे की, त्यांच्याकडे गुन्हा क्र.८२/२०२५ चे तपासकाम दिले होते. ठाणे प्रभारी पी.आय. धुमाळ यांच्या आदेशाने प्रस्तुत गुन्हयाचे तपासकाम त्यांच्याकडे देण्यात आले होते. तपासाकामी त्यांना आरोपी विरोधात सबळ पुरावे मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असे सांगितले. सदर साक्षीदाराने उलटतपासात दोषारोपपत्र दाखल केले त्यावेळेस जप्त मुद्देमाल दारु होता हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांच्याकडे नव्हता ही बाब मान्य केली आहे. त्याचप्रमाणे, आरोपीतर्फे देण्यात आलेल्या इतर सुचक प्रश्नांना स्पष्ट नकार दिला आहे.

०६. अभिलेखावरील सर्व तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे सविस्तर अवलोकन करण्यात आले. अभियोगपक्षाचे असे प्रकरण आहे की, आरोपीच्या ताब्यात गोवा बनावटीच्या १८० मिली मापाच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या ४८ बॉटल, हेवार्डस फाईन व्हीस्कीच्या १२ बॉटल आणि हनी ब्लेन्ड प्युअर ब्रॅण्डीच्या

२९ बॉटल मिळून आल्या होत्या. सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला होता व त्या मुद्देमालातील नमुना बाटल्या परीक्षणासाठी वेगळया काढण्यात आल्या होत्या. नि.क्र.सी–१ वरील रासायनिक अहवालावरुन परिक्षणासाठी पाठविलेला नमुना दारु होती ही बाब स्पष्ट होते. मात्र सदर कामी पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे सदर कामी पंचनामा शाबीत झालेला नाही. तसेच, सदर कामी नमुना वाहक यांनाही तपासले नाही. त्यामुळे आरोपीच्याच ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल हा रासायनिक तपासणीसाठी पाठवण्यात आला होता ही बाब योग्य पुराव्या अभावी शाबीत झाली नाही. त्यामुळे प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविलेला नमुना आरोपीकडून मिळून आला होता ही बाब सिध्द होत नाही.

०७. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, आरोपीला प्रस्तुत प्रकरणातील गुन्हयाशी जोडणारा पुरावा अभिलेखावर नाही. तसेच, इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून गोवा बनावटीच्या दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता, याबाबत कोणताही विश्वासार्ह व स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, आरोपी गैरकायदेशीरपणे विना परवाना गोवा बनावटीची दारुची विक्री करण्याकरीता गोवा बनावटीची दारु सोबत बाळगुन होता हे तथ्य सिध्द करण्यास अभियोग पक्ष पुर्णतः अपयशी ठरला आहे.

०८. मी यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्षाने दिलेल्या पुराव्यावरुन आरोपीवर ठेवण्यात आलेल्या आरोपाला आवश्यक असलेल्या सर्व घटकांची पुर्तता होत नाही. इतर साक्षीदारांना तपासण्यात आलेले नाही. अभियोग पक्ष आरोपी विरुध्द निःसंशयपणे गुन्हा सिध्द करु शकलेला नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नाही म्हणून देण्यात येतो.

**मुद्दा क्र. २ करीताः–**

०९. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रश्न क्र.१ च्या निष्कर्षावरुन, प्रश्न क्र.२ करीता मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी अनिस महम्मद होलसेकर यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) च्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | अपील कालावधीनंतर खटल्यातील जप्त मुद्देमाल महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम कलम ९८ अन्वये विल्हेवाटकामी राज्य उत्पादन शुल्क विभाग, कणकवली क्र.२ यांच्याकडे पुढील कारवाईसाठी पाठविण्यात यावा. |
| ३. | आरोपीचे जातमुचलके भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१(१) अन्वये पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरीता पुढे कायम करण्यात येत आहेत. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.06.09 17:52:21 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः ०९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड